# B.K. BIRLA CENTRE FOR EDUCATION
SARALA BIRLA GROUP OF SCHOOLS
A CBSE DAY-CUM-BOYS' RESIDENTIAL SCHOOL

INDIAN PUBLIC SCHOOLS' CONFERENCE

## TERM-1 EXAMINATION (2026-27)
**MARATHI [SET-2]**

Class : X | Duration: 3 Hrs
Date : 02.09.2026 | Max.Marks: 80
Admission No.: | Roll No.:

---

कृतिपत्रिकेसाठी सूचना :

(1) स्वच्छता, नीटनेटकेपणा व लेखननियमांनुसार लेखन यांकडे जाणीवपूर्वक लक्ष दयावे.

---

## विभाग (अ) वाचन व आकलन गुण (15)

**प्र 1 :– (आकलन ) अ: अपठित गद्यांश :–**

भारत देश म्हणजे पृथ्वीचा मुकुटमणी आहे. त्यामध्ये संपत्तीचे विपुल भांडार आहे. सगळे महत्त्वाचे धातू भारतात सापडतात. गंगा,यमुना,कृष्णा,गोदावरी,कावेरी आणि नर्मदा आपल्या अमृतजलाने त्याच्या भूमीचे सिंचन करतात. येथील कसलेल्या जमिनीत सदैव सोने पिकते. ऋतूंचे चक्र सदैव मनाला आकृष्ट करते. भारतभूमीच्या आकर्षणाने विदेशी लोक नेहमीच आकर्षित होतात. अनेक विदेशी लोकांना येथे कोणत्या ना कोणत्या निमित्ताने येऊन ज्ञान आणि वैभव प्राप्त करून घेण्याचा प्रयत्न केला. अनेक महापुरूषांनी येथे जन्म घेऊन मानवतेचा बोध केला. रामाची मर्यादाशीलता,कृष्णाचा कर्मयोग ,गौतमाची अहिंसा,युधिष्ठिराचा धर्म,कर्णाची दानशूरता, अर्जुनाचे युध्दकौशल्य आणि महावीराची करूणा ही जीवन चरित्र्याच्या आदर्शाची अनुपम उदाहरणे आहेत. भारताचा इतिहास गौरवाच्या सर्वोच्च शिखरावर पोहोचलेला होता. नालंदा आणि तक्षशीला यांसारखी विदयापीठे ज्ञान आणि विज्ञानाच्या अध्ययनाची अद्भुत केंद्रे होती पाणिनीसारखे वैय्याकरण आणि चाणक्यासारखे अर्थशास्त्र व राजकारणपदटू तक्षशीला विदयापीठाचेच अध्यापक होते. जगाातील सर्वात प्राचीन ग्रंथ वेद, उपनिषदे,आणि गीता यांची निर्मिती भारतामध्येच झाली. व्यास,भवभूती,कालीदास,ज्ञानेश्वर,तुकाराम,तुलसीदास यांसारख्या प्रतिभावंतांनी आपल्या काव्यवैभवाने जगाला विस्मित केले.

**(अ) दिलेला गदय उतारा वाचून विचारलेल्या प्रश्नांची उत्तरे पर्यायांमधून निवडा. (कोणतेही 5) (5X1=5)**

(1) भारत देश कोणाचा मुकुटमणी आहे?

**अ विश्वाचा** **ब संतांचा**
**क पृथ्वीचा** **ड परमेश्वराचा**

(2) येथे जन्मलेल्या महापुरुषांनी कोणते कार्य केले?

**अ ज्ञानदान** **ब धर्मप्रसार**
**ब उपदेश** **ड मानवतेचा बोध**

(3) अद्भूत केंद्रे कशास म्हटले आहे?

**अ प्राचीन ग्रंथांना** **ब नालंदा,तक्षशीला विदयापीठांना**
**क भारतभूमीला** **ड महापुरुषांना**

(4) येथील कसलेल्या जमिनीत काय पिकते?

**अ धान्य** **ब सोने**

**क मोती** **ड संपत्ती**

(5) विदेशी लोकांनी भारतात येऊन काय केले ?

**अ ज्ञान आणि वैभव प्राप्त करून घेतले** **ब नदयांचे पाणी नेले**

**क भारतातील लोकांचे शोषण केले** **ड वसाहती स्थापन करून व्यापार वाढविला**

(6) पाणिनी आणि चानक्य कोणत्या विदयापीठामध्ये अध्यापक होते?

**अ नालंदा** **ब शारदापीठ**

**क तक्षशीला** **ड बनारस**

**प्र 1(आ) उताऱ्याच्या आधारे खालील प्रश्नाचे उत्तर एका वाक्यात लिहा :–(कोणताही तीन) (3X1=3)**

1 लेखकाने कोणकोणत्या नदयांचा उल्लेख केला आहे?

2 चाणक्य कोण होते?

3 जगातील सर्वात प्राचीन ग्रंथ कोणता?

4 कोणकोणत्या प्रतिभावंत कवींचा उल्लेख लेखकाने केला आहे?

**प्र 2:– (आकलन ) अः– अपठित पद्यांश**

राजास जी महाली, सौख्य कधी मिळाली
ती सर्व प्राप्त झाली, या झोपडीत माझ्या
    भूमीवर पडावे,ताऱ्यांकडे पहावे
    प्रभुनाम नित्य गावे, या झोपडीत माझ्या
पहारे आणि तिजोऱ्या यातून होती चोऱ्या
दारास नाही दोऱ्या या झोपडीत माझ्या
    जाता तया महाला मज्जाव शब्द आला
    भीतीने यावयाला, या झोपडीत माझ्या
महाली मऊ बिछाने, कंदील शामदाने
आम्हा जमीन माने या झोपडीत माझ्या
    पाहून सौख्य माझे, देवेंद्र तो ही लाजे
    शांती सदा विराजे या झोपडीत माझ्या

**प्र 2 (अ) खालील प्रश्नांची उत्तरे पर्यायामधून निवडा :– (4X1=4)**

1 सर्व सुखे कोठे प्राप्त झाली ?

**अ घरात** **ब महालात** **क झोपडीत** **ड गावात**

2 बिछाने , कंदील शामयाने कोठे आहेत ?

**अ विदयालयात** **ब वस्तीगृहात** **ग महालात** **घ झोपडीत**

3 चोऱ्या कोठून होतात ?

**अ बॅकांमध्ये** **ब तिजोऱ्यातून ग घरातून** **क पहारे व तिजोऱ्यातू** **ड बंगल्यातून**

4 झोपडीतील सौख्य पाहून कोण लाजणार आहे?

**अ देवी** **ब देवेंद्र** **क देवदत्त** **ड देवता**

5 भूमीवर पडून कोणाकडे पाहावयास कवी सांगत आहे ?

**अ सूर्याकडे** **ब आकाशाकउे** **क ताऱ्यांकडे** **ड चंद्राकडे**

**प्र 2 (ब) एका वाक्यात उत्तरे लिहा :– (3X1=3)**

**1** झोपडीत कोणते सुखे आहेत असे कवीला वाटते ?

**2** चोऱ्या कशा होतात ?

**3** महालात काय काम आहे ?

**4** कवीच्या झोपडीत काय आहे?

**विभाग :– ब ( 20 गुण)**

**प्र 3 (अ) सुचनेप्रमाणे उत्तरे लिहाः– (कोणतेही चार)** **(4X1=4)**

**1** खालीलपैकी भावाचक नामाचा योग्य पर्याय कोणता?

**अ** समुद्र **ब** झाड **क** आनंद **ड** मनुष्य

**2** छी! किती घाणेरडे तुझे कपडे! (**केवलप्रयोगी अव्यय ओळखा)**

**अ** किती **ब** छी! **क** घाणेरडे **ड** अक्षर

**3** मुलांसाठी बाबांनी खूप कष्ट उपसले. **(अधोरेखित शब्दाची जात ओळखा)**

**अ** क्रियाविशेषण अव्यय **ब** विशेषण **क** शब्दयोगी अव्यय **ड** सर्वनाम

**4** विदयार्थ्यांनी काल मैदानावर खूप खेळ खेळला. **(क्रियाविशेषण अव्यय ओळखा)**

**अ** काल **ब** खूप **क** मैदान **ड** मुले

5 मामा आले व त्यानी हातपाय धुतले. **(आधोरेखित शब्दाची जात ओळखा)**

**अ** विशेषण **ब** उभयान्वी अव्यय **क** क्रियाविशेषण अव्यय **ड** अलंकार

**प्र 3 (ब) काळ ओळखा व बदला ( कोणतेही तीन)** **(3X1=3)**

**1** संगीता पुस्तक वाचेल( काळ ओळखा).

**2** खर्च केलेल्या रूपयांचा मी हिशोब केला . (भविष्यकालिन वाक्य तयार करा)

**3** गावात गंथालयासाठी खूप मदत मिळेल. ( वर्तमानकालिन वाक्य करा )

**4** निता सकाळी व्यायाम करतो.(काळ ओळखा)

**प्र 3 (क) वाक्याचे प्रकार ओळखा ( कोणतेही तीन)** **(3X1=3)**

**1** किती छान आहे तुझा गाव!

**2** उमेशच्या घरापासून नदी लांब नाही. ( विधानार्थी होकारार्थी वाक्य करा )

**3** सर्वांनी खूप खेळावे ( आज्ञार्थी वाक्य तयार करा)

**4** तुझा आवाज खूप छान आहे (उद्‌गारार्थी वाक्य तयार करा).

**प्र 3 (ड) समानार्थी शब्द ( कोणतेही दोन)** **(2X1=2)**

**1 खालालपैकी समानार्थी शब्दाची योग्य जोडी ओळखा :–**

**1** काळ– बाळ **2** वृक्ष – रुक्ष **3** विनय –नम्रता **4** आहार–विहार

**2 खालील पैकी गटात न बसणारा शब्द कोणता :–**

1 कष्ट 2 ताकद 3 सामर्थ्य 4 बळ

**3 सृष्टी– समानार्थी शब्द लिहा :–**

**1 तृप्ती 2 पाऊस 3 नजर 4 जग**

**प्र 4 (अ) विरुध्दार्थी शब्द ( कोणतेही दोन)** **(2X1=2)**

**1 खालालपैकी विरुधार्थी शब्दाची योग्य जोडी ओळखा :–**

**1** समान xअसमान **2** खरे x सत्य **3** दुर्जन xदुर्बल **4** मान xसमान

**2 जवळ या शब्दाच्या विरुद्धार्थी शब्द पुढील पर्यायांतून ओळखा :–**

**1** समीप 2 लांब 3 निकट 4 अंतर

**3 दुरुस्त या शब्दाच्या विरुद्धार्थी शब्द पुढील पर्यायांतून ओळखा :–**

1 बिघडलेला 2 तुटलेले 3 तंदुरुस्त 4 नादुरुस्त

**प्र 4 (ब) लिंग :– ( कोणतेही दोन) (2X1=2)**

**1 पुढीलपैकी भिन्नलिंगी शब्दाचा पर्याय निवडा :–**

1 गाय 2 भिंत 3 खडू 4 चिमणी

**2 लिंगविचारा नुसार गटात न बसणारा शबद कोणता?**

1 फूल 2 होडी 2 विमान 4 झाड

**3 माकड या शब्दांचे लिंग बदला –**

1 माकडी 2 माकडीण 3 माकडीणी 4 माकडा

**प्र 4(क) वचन :– ( कोणतेही दोन) (2X1=2)**

**1 खालीलपैकी निश्चितपणे एकवचनी शब्द कोणता ते ओळखा –**

1 दगड 2 पाय 3 डोळा 4 बाजू

**2 चांदणी या शब्दाचे वचन बदलून लिहा –**

3 झाडाखाली <u>फळ</u> पडले आहे. **( अधोरेखित शब्दाच्या वचनामध्ये बदल करून लिहा )**

**प्र 4 (ड) समास ओळखा ( कोणतेही दोन) (2X1=2)**

**1 खालीलपैकी समास प्रकारांच्या गटात न बसणारा शब्द कोणता?**

1 भाजीपाला 2 प्रहार 3 पंचपाळे 4 सूर्योदय

**2 शेतीवाडी या शब्दाचा समास पुढीलपैकी कोणता?**

1 इतरेतर व्दंद समास 2 व्दिगु समास 3 अव्ययीभाव समास 4 समाहार व्दंद समास

**3 मुलांनी कविता <u>तोंडपाठ</u> केली. ( अधोरेखित शब्दाचा समास ओळखा )**

1 व्दिगु 2 अव्ययीभाव समास 3 इतरेतर व्दंद समास 4 समाहार व्दंद समास

## विभाग–क पाठयपुस्तक आधारित (30 गुण)

**प्र 5 (अ) एका वाक्यात उत्तरे लिहा (कोणतेही तीन) (3X1=3)**

1 स्नेहलने कोणता निश्चय केला?

2 पंतांचा अत्यंत कुंचकट शेजारी कोण होता?

3 तपोवनातील स्त्रियांना अब्दुल कशासारखा वाटायचा?

4 शालींच्या वर्षावाखाली कोणाची शालीनता हरवली नाही?

**प्र 5 (ब) रिकाम्या जागी योग्य शब्द भरा (कोणतेही तीन) (3X1=3)**

1 रेखामावशीचे पाय ––––––आहेत.

2 वजनाचा मार्ग भलत्याच ––– जातो.

3 सुर्वे मुळातच –––––– होते.

4 एखादया –––एकाएकी रंग उडून जावा तशी जीवनेच्छा एकाएकी उडून गेली.

**प्र 5 कः– खालीलपैकी कोणत्याही <u>एका</u> प्रश्नाचे उत्तर थोडक्यात लिहाः– (1X3=3)**

1 भिक्षेकऱ्याने केलेला शालीचा उपयोग याविषयी तुमचे मत लिहा–

2 तापाने फणफणतीय आपली धरती ही परिस्थिती बदलण्यासाठी उपाय सुचवाः–

3 माशेलकरांच्या यशात आईचा मोठा वाटा होता आपल्या शब्दात स्पष्ट करा?

**प्र 5 डः– वाक्प्रचारांचा योग्य वापर करून वाक्य पुन्हा लिहा :– (5X1=5)**

**( धीर न सोडणे, पाया पक्का होणे, गुंग झाले,उपद्रव्य करणे,न खचणे)**

**1** दंगेखोर सुमीत घरात नको त्या गोष्टी करत असतो.

**2** ताईचे गाणे ऐकण्यात सारे जण रममान झाले होते.

**3** भावे सरांनी माशेलकरांचे भौतिकशास्त्राचे ज्ञान भक्कम केले.

**4** आयुष्यात इतकी संकटे येऊनही आई कधीही निराश झाली नाही,

**5** कठीण परिस्थितीत रामरावाने हिंमत न हारता काम केले.

**प्र 6 अ :– (अ) एका वाक्यात उत्तरे लिहाः– ( कोणतेही चार ) (4X1=4)**

**1** दोन दिवस ही कविता कोणत्या काव्यसंगहातून घेतली आहे?

**2** संत नामदेव चातक कोणास म्हणतात?

**3** अंकिला मी दास तुझा संतवाणीचे संपादक कोण आहेत?

**4** कवीचे हात कोणाकडे गहाण पडले?

**5** हरिणी कोणासाठी चिंतीत आहे ?

**प्र 6 (ब) रिकाम्या जागी योग्य शब्द लिहा :–(कोणतेही चार) (4X1=4)**

**1** –––– मी दास तुझा .

**2** हरघडी ––– वाळविले नाहीत.

**3** –––– करतो आहे किती डोईवर राहिले उन्हाळे.

**4** भुकेलें ––––––धेनु हुंबरत धावे.

**5** तेव्हा अश्रूच मित्र होउन –––––––– आले.

**प्र 6 क) खालील काव्यपंक्तींचे संदर्भासहित स्पष्टीकरण कराः–(कोणतेही एक) (1X3=3)**

**1** झोतभट्टीत शेकावे पोलाद तसे आयुष्य छान शेकले
दोन दिवस वाट पाहण्यात गेले दोन दुःखात गेले

**किंवा**

नामा म्हणे मेघा जैसा ।
विनवितो चातक तैसा ।।

**प्र 7 अ स्थूलवाचन :– एका वाक्यात उत्तरे लिहा :– ( कोणतेही पाच ) (5X1=5)**

**1** अनिल काकोडकरांनी आपले किती वर्षांपूर्वीचे अनुभव सांगितले आहेत ?

**2** ट्रेनिंग स्कूलला होमी भाभा किती वेळा आले होते ?

**3** बार्क म्हणजे काय ?

**4** बोट धरून चालवणे वयाच्या कितव्या वर्षापर्यंत ठीक आहे?

**5** लेखक ट्रेनिंग स्कूलला काय म्हणून जॉईन झाले?

**6** काकोडकर दुसऱ्या अनुभवातून काय शिकले?

**विभाग– ड लेखन– (गुण 15)**

**लेखन**

**प्र 8 अ खालीलपैकी कोणत्याही एका विषयावर निबंध किंवा गोष्ट लिहा (शीर्षक आणि तात्पर्य आवश्यक) :– (1X6=6)**

**1 आमच्या शाळेतील क्रीडादिन**

**मुद्देः–** मुलांसाठी उत्साहाचा दिन––विविध खेळांचे आयोजन –– विदयार्थ्यांमध्ये जिंकण्यासाठी चुरस–पालकांना झालेला आनंद––विजेत्यांचे सर्वांकडून झालेले कौतुक .

**2 मी मुख्यमंत्री झालो तर ......**

**मुद्दे :–** देशाचे भविष्य ––– सध्याची स्थिती ––– तणाव व समस्या ––– उपाययोजना ....अपेक्षा

**3 क्रीडांगणाचे मनोगत**

मुद्दे :– पूर्वी असलेले महत्त्व ––– विविध मैदानी खेळ –––विदयार्थ्यांची किलबिल–––आजची स्थिती... खंत ....परिणाम.

. **किंवा**

उंट व कोल्हा मित्र–––पाणी पिण्यासाठी नदीवर जाणे––नदी पलीकडे उसाचे शेत पाहून खाण्याची इच्छा––उंटाचे कोल्हाला पाठीवर बसवून नदी पार करणे––लवकर पोट भरल्याने कोल्हाचे ओरडणे––उंटाची न ओरडण्याची विनंती––मालक धावत येणे–कोल्हाचे पळून जाणे–– उंटाला मार––परत येताना उंटाचे पाण्यात बसणे––कोल्हाची न बसण्याची विनंती –––तात्पर्य .

किंवा

एक शिकारी ––शेतात जाळे––कबुतरांचा थवा ––शेतातील दाणे टिपणे –––जाळयात अडकणे––प्रमुखाचा सल्ला –––जाळे घेऊन उडा –––कबुतरांचे जाळयासहित उड्डाण –––सुटका –––तात्पर्य.

**प्र 8 (ब) पत्र लेखन :– ( कोणतेही एक ) (1X4=4)**

तुम्ही राधा/रमन कुलकर्णी, गांधी मार्ग,सोमवार पेठ,पुणे–404430,रहिवाशी आहात तुमच्या भागातील भटक्या कुत्र्यांचा वाढलेला वावर कमी करण्यासाठी पुणे महानगरपालिकेच्या व्यवस्थापकास तक्रार पत्र लिहा.

**किंवा**

वनिता/विनय पाटील, विदयानिकेतन विदयालय,पुणे येथून शाळेच्या बागेसाठी फुलझाडे मागविणारे पत्र दुर्गा रोपवाटिका ,तळेगाव दाभाडे, पुणे यांना मागणी पत्र लिहा :–

**प्र 8 (क) जाहिरात लेखन :–( कोणतेही एक ) (1X5=5)**

आपल्या परिसरातील किराण मालाच्या दुकानासाठी एक आकर्षक जाहिरात तयार करा :–

**किंवा**

आपल्या परिसरातील ताज्या आणि तजेलदार भाज्यासाठी एक आकर्षक जाहिरात तयार कराः–

**:::::::::::::::::::::: समाप्त ::::::::::::::::::::::::::**